**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**(असाधारण)**

**अधिसूचना**

क्र. ९७/२०२२ दि. ३०.७.२०२२

**विषय -अधिसभा निवडणूक - २०२२**
**नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीबाबत मुदतवाढ**

संदर्भ - १) अधिसूचना क्र. ७९/२०२२, दि. ३०.६.२०२२
२) अधिसूचना क्र. ८५/२०२२, दि. १९.७.२०२२

संदर्भांकित क्र.१) वरील अधिसूचनेद्वारे पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नांव नोंदणीसाठी ऑनलाईन पद्धतीने, विहित केलेल्या अर्जामध्ये दि. १.७.२०२२ ते २०.७.२०२२ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. सदर कालावधी संपण्यापूर्वी संदर्भीय क्र.२) वरील अधिसूचनेद्वारे अर्ज भरण्याच्या तिथीला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात येऊन दि. ३०.७.२०२२ पर्यंत अर्ज भरता येतील असे अधिसूचित केले व भरलेले अर्ज दि. १ ऑगस्ट, २०२२ पर्यंत विद्यापीठाला सादर करावे असेही सूचित केले आहे. परंतु विविध संघटनांकडून प्राप्त निवेदनांनुषंगाने मा.कुलगुरूंनी निर्देशित केल्यानुसार पुन्हा मुदतवाढ न मागण्याच्या अटीवर सर्वांसाठी पुन्हा एक शेवटची संधी म्हणून दिनांक १० ऑगस्ट, २०२२ पर्यंत अर्ज भरण्याला मुदतवाढ देण्यात येत आहे. सोबतच ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी विद्यापीठाकडे जमा न करण्याच्या संघटनांच्या मागणीचा विचार लक्षात घेता दि. ३१ जुलै, २०२२ पासून पुढे ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत विद्यापीठात सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

स्वा./-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ